## प्रकरण पहिले

# कादंबरी संकल्पना, दलित कादंबरीचे स्वरूप

# प्रकरण पहिले
# कादंबरी संकल्पना, दलित कादंबरीचे स्वरूप

## प्रास्ताविक

कथा, काव्य आणि नाटक या वाङ्मय प्रकारापेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार अधिक महत्त्वपूर्ण आहे. जगात ज्या-ज्या भाषेत साहित्य निर्माण झाले त्यात लोकप्रियतेच्या बाबतीत कादंबरीच अग्रेसर ठरलेली दिसते. 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार कमी कालावधीत जास्त भरभराटीला आलेला वाङ्मयप्रकार आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार गद्यातून विस्तृत जीवनपट मांडणारा वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. कादंबरी या वाङ्मयप्रकाराने सर्व मानवजातीला आपल्या कवेत घेतले आहे. सुख दु:खे अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

समाज आणि कादंबरी यांचे अतूट स्वरूपाचे नाते आहे. समाजाच्या वळणाबरोबर कादंबरीही सतत नवे वळण घेत असते. कादंबरी हा सतत बदलत जाणारा परिवर्तनशील असा साहित्यप्रकार आहे. जीवनविषयक विस्तृत चिंतन आणि मानवी जीवनातील व मनुष्यमात्रांच्या मनातील नानाविध भावभावनांचे दर्शन कादंबरी यथार्थपणाने आणि मोकळेपणाने घडवू शकते. मानवी स्वभावचित्रण, घटना, कथानके, निवेदनाच्या पद्धती, यांची विविधता आणि वैचित्र्य यांनी हा वाङ्मयप्रकार संपन्न झाला आहे. पौराणिकता, राजकीयप्रणाली, अद्भुतरम्यता, वास्तवता, मानवी जीवनातील गंभीर समस्या व मानवी जीवनातील प्रसन्नता अशा असंख्य रूपाचे दर्शन कादंबरीमध्ये घडू शकते.

कादंबरी हा वाचक आणि लेखकांच्या आवडीचा प्रभावी साहित्यप्रकार मानला जातो. मुळातच तो कथात्म साहित्यप्रकार असल्याने कादंबरीचे आकर्षण वाटत असावे. त्यामुळे हा साहित्यप्रकार लोकप्रिय ठरला आहे.

वाङ्मयप्रकारातील कथा, कविता, ललित गद्य, नाटक यातून आत्माविष्कार करता येत असला तरी त्यांच्यावर बंधने बरीच येतात. कवितेत आत्मनिष्ठेला आणि मानवी वृत्तीतील काव्यात्मतेलाच प्राधान्य असते. कथेत कोणताही अनुभव व्यक्त करताना तिच्या लांबीची, कालपटाची अंगभूत मर्यादा असते. नाटक हा वाङ्मयप्रकार सादरीकरणामुळे बंदिस्त असून संवादापलीकडे जाऊन भाषेचा मुक्तपणे वापर करता येत नाही. पण कादंबरी ह्या साहित्यप्रकाराच्या बाबतीत अशी काही बंधने येत नाहीत. त्यामुळे मानवी जीवन व्यवहारातील सर्वांगाना स्पर्श करण्यासाठी जी भाषा योग्य, आवश्यक वाटत असेल, ती काव्यात्म, गद्यात्म, आत्मनिष्ठ, वस्तूनिष्ठ, प्रमाणभाषा, बोलीभाषा कादंबरीकार योजू शकतात. अशा या समृद्ध कादंबरीची उत्पत्ती जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

**कादंबरीची उत्पत्ती**

मराठी साहित्यातील एक समृद्ध दालन म्हणून मराठी कादंबरीकडे पाहिले जाते. मराठी साहित्यात कादंबरी हा वाङ्मयप्रकार महत्त्वपूर्ण असला तरी तो इंग्रजी राजवटीतच जन्माला आला. मराठी कादंबरीचा इतिहास १५० वर्षे इतका जुना आहे. पाश्चात्य इंग्रजी साहित्याच्या अनुकरणातून 'कादंबरी' हा साहित्यप्रकार रूढ झाला. कादंबरीच्या निश्चित उत्पत्तीबाबत काही विचारवंतांनी मते मांडली आहेत. 'प्रदक्षिणा' या ग्रंथात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ''तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची प्रवृत्ती पुरातन आहे. पुराणे, आख्याने, बखरी इ. ग्रंथातून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात. हे खरे आहे.''[१] यावरून मराठी कादंबरीचे स्वरूप प्राचीन मराठी साहित्यात आढळतात. फक्त तिला इंग्रजी राजवटीचे वेगळे रूप प्राप्त झाले. याउलट मराठी विश्वकोशामध्ये 'कादंबरी' या शब्दापुढे जो अर्थ दिला आहे तो असा ''इंग्रजी साहित्यामध्ये कादंबरीचा उगम अठराव्या शतकाच्या मध्यास झाला व भारतीय साहित्यात तो इंग्रजी कादंबऱ्यांच्या नमुन्यावर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला.''[२] यावरून मराठी कादंबरीचे उत्तरदायीत्व इंग्रजी साहित्याकडे जाते.

'नॉव्हेल' या इंग्रजी संज्ञेपासून मराठीमध्ये 'कादंबरी' हा पर्यायी शब्द आलेला आढळतो. कादंबरी हे नाव संस्कृतमधील बाणभट्टाच्या 'कादंबरी' या संस्कृत कथात्मक ग्रंथावरून मराठीत रूढ झाले आहे. सुरूवातीस 'नॉव्हेल' ला 'नावल' असा शब्दप्रयोग प्रचारात आला. 'नावल' हा शब्द का. बा. मराठे यांनी १८७८ च्या फेब्रुवारीस मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढे जो निबंध वाचला, त्यातून तो पुढे रूढ झाला. मराठी भाषा शब्दकोशामध्ये (१८३९) कादंबरी या संज्ञेचा अर्थ "कल्पित कथा"[३] असा दिला आहे. जान्हवी संत यांनी कादंबरी या संज्ञेचा अर्थ "कदंब फुलापासून तयार केलेले मद्य किंवा आसव"[४] असा केला आहे.

यावरून कादंबरीस अनेक शब्द वापरले तरी शेवटी कादंबरी हा शब्दच सर्वमान्य ठरला.

**कादंबरीची व्याख्या**

कादंबरीच्या उत्पत्तीचा अभ्यास केल्यानंतर कादंबरी या संज्ञेची व्याख्या पाहणे गरजेचे आहे.

विशाल अशा मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरूप अफाट व गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे खुप अवघड आहे. आजवर अनेकांनी कादंबरीची व्याख्या केली आहे. असे करीत असता कादंबरीच्या निरनिराळ्या अंगावर व विशेषावर भर दिला गेला आहे. त्यापैकी काही निवडक व्याख्या मांडल्या आहेत.

**मराठी साहित्यिकांनी मांडलेल्या व्याख्या**

**१. मा. का. देशपांडे**

"कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य-चित्र होय"[५]

**२. प्रा. बापट व गोडबोले**

"सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्टीरूपाने वर्णन

करून व कलानंदाची प्राप्ती करून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या गद्य वाङ्मयाचे विभाग म्हणजे कादंबरी''[६]

**३. ना. सी. फडके**

''तांत्रिक अंगावर भर देवून गुंतागुंत, निरगाठ आणि उकल अशी तीन स्थाने कादंबरीत असावयास पाहिजेत.''[७]

**४. भालचंद्र नेमाडे**

''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयाचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते.''[८]

**५. श्री. मा. कुलकर्णी**

''कार्यकरण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी.''[९]

**६. रा. ग. जाधव**

''कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकांचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[१०]

**७. जान्हवी संत**

''मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी एक ललित गद्य-कथा होय.''[११]

**हिंदी साहित्यिकांनी मांडलेल्या व्याख्या**

**१. प्रेमचंद**

''मैं उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यासों का मूल तत्व है।''[१२]

**२. मैथिलीशरण गुप्त**

"उपन्यास-साहित्य मानव जीवन की व्याख्या और आलोचना है।"[१३]

**३. श्याम सुंदरदास**

"उपन्यास मनुष्य के वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है।"[१४]

**४. श्री. गुलाबराय**

"उपन्यास कार्यकारण श्रृंखला में बंधा हुआ वह गद्य कथानक है जिसमें अपेक्षाकृत अधिक विस्तार तथा पेचीदगी के साथ वास्तविक जीवन की प्रतिनिधित्व करनेवाले व्यक्तियों से सम्बधित वास्तविक वा काल्पनिक घटनाओं द्वारा मानव जीवन के सत्य का रसात्मक रूपसे उद्घाटन किया जाता है."[१५]

**५. डॉ. गणपतीचन्द्र गुप्त**

"उपन्यास शब्द का मूलअर्थ निकट रखी हूई वस्तू (उप-निकट,, न्यास-रखी हूई) किन्तु आधुनिक युग में इसका प्रयोग साहित्य के ऐसे रूपविशेष के लिए होता हैं, जिसमें एक दिर्घकथा का वर्णन किया जाता है।"[१६]

**पाश्चात्य साहित्यिकांनी मांडलेल्या व्याख्या**

**१. डेविड सीसील**

"जीवित जगताचा परिचय करून देणारी एक कला" म्हणजे कादंबरी होय.[१७]

**२. जे. बी. प्रिस्टले**

"मानवी जीवनाचा आरसा म्हणजे कादंबरी होय."[१८]

**३. अनेस्ट बेकर**

"ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृतांत म्हणजे कादंबरी होय."[१९]

## ४. हेनरी जेम्स

"कादंबरी म्हणजे वैयक्तिक जीवनानुभूती होय."[२०]

## ५. कॅथरीन लिव्हर

"कादंबरी म्हणजे मर्यादित लांबीचा गद्य वृत्तांत असलेला घाट होय. ज्यात लेखकाने निर्माण केलेल्या काल्पनिक वास्तव जगतात वाचकाला गुंतविले असते."[२१]

कादंबरीच्या व्याख्या अशा प्रकारे अनेक विद्वानांनी आपापल्या परीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून कादंबरीची काही लक्षणे स्पष्ट होण्यासारखी आहेत.

## कादंबरीचे घटक

कादंबरीची निश्चित अशी व्याख्या देता येत नसली तरी तिचे निश्चित असे घटक मात्र दाखवता येतात. हे घटक प्रत्येक कादंबरीमध्ये कमी अधिक प्रमाणात निश्चितपणे पहावयास मिळतात. कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, वातावरण निर्मिती, भाषाशैली, संवाद, मनोविश्लेषण, इ. कादंबरीचे घटक मानले जातात. असे हे घटक कादंबरीमध्ये कशा पद्धतीने अवतरतात. यांची चर्चा आपणास इथे करावयाची आहे.

## १. कथानक

कादंबरीच्या घटकांमध्ये कथानक हा महत्त्वपूर्ण घटक आहे. कथानक हा कादंबरीचा गाभा आहे. "कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालाच्या अवकाशात घडत आहेत. कादंबरीतील पात्रे काय करीत आहेत. त्याचे विचार काय आहेत. हे कादंबरीकार सांगत असतो. या साऱ्याची जुळणी करणाऱ्या एकात्म घट्ट विणीलाच कथानक"[२२] असे म्हणतात विविध प्रसंगाची गुंफण करूनच कथानक तयार होते. कथानक हा शब्द कथा ह्या शब्दापासून बनला आहे. कादंबरीची उभारणी व तिचे यशापयश कथानकावर अवलंबून असते. कथानकाच्या तीन अवस्था असतात, प्रारंभ

मध्य, शेवट या तीन अवस्थेतून कथानक घडत असते. कथानकात संघर्षाला विशेष महत्त्व असते. वाचकाचे मन खिळवून ठेवणारा असा संघर्ष कथानकात निर्माण झाला पाहिजे. कथानकात उपकथानके असावीत. त्यामुळे वाचक खिळवून ठेवला जातो. याविषयी प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले म्हणतात, ''पुढील प्रसंगाविषयी जिज्ञासा उत्पन्न करून लेखकाने वाचकांचे लक्ष्य पात्रांच्या गुणधर्माकडे खेचले म्हणजे त्याचा बराच कार्यभार झाले असे म्हणावयास हरकत नाही.''[२३] पण उपकथानक हे मूळ कथानकापेक्षा श्रेष्ठ असू नये. तसेच कथानकामध्ये मौलिकता, संभवनीयता, सुसंघटितपणा, रचनाकौशल्य, रंजकता हे प्रमुख गुण असावे लागते.

## २. व्यक्तिरेखा

कथानकाइतकाच कादंबरीतला महत्त्वांचा घटक म्हणजे व्यक्तिरेखा होय. मानवी स्वभावाचे विविध नमुने कादंबरीत चितारले जातात. यास व्यक्तिचित्रण असे म्हणतात. हे व्यक्तिचित्रण जितकी प्रभावी आणि जिवंत होतील तितकी कादंबरी यशस्वी होत जाईल व तिचा वाचकमनावरील प्रभाव वाढेल. व्यक्तीच्या स्वभावातूनच कथानक घडत जाते. ती व्यक्ती परिपूर्ण रीतीने चित्रित करणे, तिच्या स्वभावातील बारीक–सारीक विशेष रेखाटणे ही ललितलेखकाची सर्वात मोठी जबाबदारी आहे. कथानकासाठी व्यक्ती माध्यम असणे किती गरजेचे असते. यासाठी कादंबरीकार तुर्गनेव्ह म्हणतात, ''मी लेखन प्रारंभी नेहमीच पात्रांचा विचार केला आहे. कल्पनेचा नाही,''[२४] यावरून व्यक्तिरेखाचे कादंबरीतील स्थान समजते. व्यक्तिचित्रण हे वास्तव जीवनदर्शनावरच अवलंबून असावे लागते. यांसंदर्भात प्रेमचंदजी म्हणतात, ''सजीवता यथार्थ दर्शनाशिवाय येऊ शकत नाही. यथार्थ व्यक्तिचित्रणेचं आधुनिक युगातील कादंबऱ्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.''[२५] त्यामुळे व्यक्तिरेखा हा कादंबरीतील सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे.

## ३. वातावरणनिर्मिती

कादंबरी रचनेत वातावरण हा घटक महत्त्वाचा आहे. स्थल, काल वैशिष्ट्याचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. कादंबरीतील घटना

कोणत्या तरी स्थळी व कोणत्या तरी काळी घडलेल्या असतात. या स्थळ-काळांच्या दर्शनानेच कथानकाला वातावरण मिळते. स्थळ-काळातील विशिष्ट समाज, चालीरिती, परिस्थितीचे दर्शन करण्यासाठी वातावरणनिर्मितीचा उपयोग होतो. कथानक व व्यक्तिचित्रणे यातील रहस्य उलगडण्यास वातावरणाचा फार उपयोग होतो. कथानकात वास्तवता येण्याकरीता वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. वातावरणनिर्मितीमधील पहिली पातळी प्राकृतिक, भौगोलिक अशी असते. व दुसरी सामाजिक वातावरण असते. याचबरोबर स्वत:च्या जीवनातील अनुभव पातळी, परिस्थिती यातून स्वत:च्या जीवनाबद्दल जे मत बनलेले असते. त्यांचे चित्रण लेखक कादंबरीत करतो. याप्रमाणे कादंबरीत वातावरणनिर्मिती साधली जाते. ह्याबद्दल बापट-गोडबोले यांचे मत लक्षात घेणे महत्त्वाचे वाटते ते म्हणतात, ''कादंबरीची कला यशस्वी होण्यास हे विभागात्मक वातावरणाचे कवच आपल्या कथावस्तूभोवती लेखकाने निर्माण केले पाहिजे''[२६] ऐतिहासिक कादंबरीत वातावरणाला विशेष महत्त्व असते. त्याच्याअभावी ती कादंबरी वाचकाला ऐतिहासिक काळात नेऊच शकणार नाही. वातावरणामुळे व्यक्तिदर्शनाला आणि कथानकातील प्रसंगाना खुलावट मिळते. प्रादेशिक व ग्रामीण कादंबरीत वातावरणाला फार महत्त्वाचे स्थान असते.

### ४. संवाद

संवाद हा कादंबरीचा एक अत्यंत मनोरंजक घटक आहे. संवादामुळे कादंबरीत नाट्य उत्पन्न होते. सर्वसामान्य वाचकालाही आकृष्ट करून घेण्याचे सामर्थ्य संवादात आहे. कथानकाला गती देण्याच्या उद्देशाने संवादाचा उपयोग होतो. घटना व त्याबद्दलची पात्रांची प्रतिक्रिया कळू शकते. कथानक व व्यक्तिचित्रण ह्या दोहोंशी त्यांचा निकटचा संबंध असल्याने कादंबरीत संवादाला महत्त्व असते. लेखक स्वत:चे विचार, अनुभव, जीवनाविषयक दृष्टिकोन संवादातून व्यक्त करतो. संवाद हे वास्तविक व स्वाभाविक असले पाहिजेत. कादंबरीतील संवाद हे प्रत्यक्षातील संवादासारखे तंतोतंत

असून चालणार नाही. तसेच ते कृत्रिम व पुस्तकी नसावेत. बोजड भाषा नसावी. म्हणजे कृत्रिमता व वास्तवता याचे कलात्मक मिश्रण संवादात असावेत. संवाद हे संक्षिप्त, स्वाभाविक, उपयुक्त व नाटकी असावेत, कादंबरीतील महत्त्वाचा घटक संवाद हा असला तरी त्यांचे प्रमाण बेताचेच असावे. कादंबरीचा फार मोठा भाग संवादानी व्यापू नये. निवेदन व संवाद यांची सांधे जोड कादंबरीत महत्त्वाची असते.

## ५. मनोविश्लेषन

आजच्या कादंबरीस प्रबळ व वाचनीय करणारा प्रभावी घटक म्हणजे मनोविश्लेषण होय. मानवी अंतरंगाचे भाव-भावनांचे, विकार-विचारांचे विश्लेषण करणे यासच मनोविश्लेषण म्हणतात. फ्राईड या मानसशास्त्रज्ञाने मानवी अंतरंगाचा ठाव घेऊन त्यांच्या सुप्त व अतिसुप्त मनाचे धागेदोरे उलगडण्यास सुरूवात केली व मनोविश्लेषणाचे एक नवीन दालन साहित्यिकांना उघडे करून दिले. पात्रांच्या मन: सृष्टीचे यथार्थ चित्र रंगविणे एवढाच त्यास अर्थ न राहता मनातील सुक्ष्म प्रवृत्तीचे अतृप्त व दबलेल्या भावनाचे पृथक्करण करून त्यांचा छडा लावणे होय. मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' ही अशा प्रकारची पहिली कादंबरी आहे. त्यानंतर वसंत कानेटकराची 'घर' खानोलकरांची 'रात्र काळी घागर काळी' या कादंबऱ्यामध्ये मनोविश्लेषणाचा वापर केला आहे.

कादंबरीतील पात्रांची भुमिका व मानसिकता ठरविण्यासाठी मनोविश्लेषणाचा वापर केला जातो.

## ६. भाषाशैली

लेखकाच्या अंत:करणातील विचार, विकारांना व भाव-भावनांना तसेच त्यांच्या बौद्धिक व भावनात्मक अनुभवांना मिळालेले विशिष्ट शब्दरूप म्हणजे भाषाशैली होय. विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य आहे. अनुभवांची मांडणी करण्याची लेखकाची पद्धती म्हणजे शैली होय. भाषा व शैली हे

वेगळे घटक आहेत. भाषाशैली हा कादंबरीचा एक प्रमुख घटक आहे. कादंबरीकारांची निवेदनशैली जितकी आकर्षक तितकी कादंबरीची रंजकता आणि परिणामकारकता महत्त्वपूर्ण ठरते. कथानकाच्या मांडणीला, पात्रांच्या स्वभावपरिपोषाला, प्रसंगाच्या उभारणीला आणि वातावरणाच्या निर्मितीला भाषाशैलीमुळे झळाळी मिळते. त्याचे रंगरूप आकर्षक व परिणामकारक राहते. अर्थात शैलीचे स्वरूप कादंबरीकाराच्या व्यकितमत्वाशी निगडीत असते.

कादंबरीची भाषाशैली ही जितकी साधी, सोपी, असेल तितके तिचे स्वरूप रमणीय व आकर्षक होईल. ती अलंकृत असावी पण क्लिष्ट व बोजड नसावी, भाषाशैली ही अर्थवाही व सूचक पाहिजे. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे तसेच कालमानाप्रमाणे आणि बदलत्या वाङ्मयीन प्रवाहाप्रमाणे भाषाशैली बदलत जाते.

मराठी कादंबरीत सुरूवातीला अलंकारयुक्त शब्दांची नंतर साध्या सुबोध शब्दांची व सद्यस्थितीतील अत्यंत साध्या, नेहमीच्या बोलण्या-चालण्यातले शब्द असणाऱ्या शैलीचा अवलंब केला जात आहे. प्रादेशिक व ग्रामीण कादंबरीत त्या-त्या प्रदेशातील ग्रामजीवनातील भाषेचा सर्रास वापर करून वास्तवतेचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न होत आहे. उपमा, उत्प्रेक्षा तसेच खटकेबाज संवाद ही कादंबरीच्या भाषाशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

### ७. संघर्ष

संघर्ष हे मानवी जीवनाचे आवश्यक अंग आहे. हा संघर्ष जीवनाचा आत्मा असतो. तसाच तो कादंबरीचाही आत्मा आहे. संघर्षाशिवाय कोणतीही कलाकृती मानवी मनाची पकड घेऊ शकत नाही. कारण मानवी मनाला संघर्षाचे नेहमीच आकर्षण असते. हा संघर्ष अनेक प्रकारचा असू शकतो. मग तो संघर्ष मनुष्य व बाह्य विरोधी शक्ती यांच्यातला असेल किंवा मनुष्य किंवा सामाजिक परिस्थितीमधील, किंवा

मनुष्या-मनुष्यातला असेल. म्हणजेच हा संघर्ष चांगले आणि वाईट विचारामध्ये असू शकतो तर कधी दोन सद्विचारामध्ये असू शकतो.

संघर्ष हा कादंबरीतील कथानकाचा केंद्रबिंदू असतो, कादंबरीचे तंत्र, रचना कौशल्य व आकर्षकता हे संघर्षावरती अवलंबून असते. संघर्षात मानवाचे धैर्य, साहस, सत्य इत्यादी गुणांची कसोटी लागते. मनुष्याच्या अंतर्मनातील संघर्ष रंगविण्यासाठी त्या व्यक्तीच्या विविध स्वभावाचे सखोल ज्ञान असले पाहिजे. मानवी मनाची जडणघडण जितकी आवश्यक आहे. तितक्याच महत्त्वाचे त्या व्यक्तीचे चालणे, बोलणे, त्यांचा पोशाख, हावभाव यासारख्या गोष्टीची माहिती असावी लागते. या गोष्टीशिवाय त्या व्यक्तिला अभिप्रेत असलेला अर्थ, यथार्थपणे साधता येणार नाही.

ज्या कादंबरीत संघर्ष नाही त्यात वाचकाचेही मन रमत नाही. वाचकाचे मन खिळवून ठेवणारा असा संघर्ष कादंबरीत निर्माण झाला पाहिजे. तो प्रभावी आणि पिळदार असावा लागतो.

**मराठी कादंबरीची वाटचाल**

काव्य, नाटक अशा कथाप्रधान ललित कृतीप्रमाणेच अव्वल इंग्रजीच्या काळात भाषांतराच्या मार्गाने मराठी कादंबरी वाचकासमोर येत होती. इंग्रजी, संस्कृत, फार्सी इत्यादी भाषातील लहान गोष्टीचे वा कथांचे वर्णन करून कादंबरी घडत होती. सुरूवातीच्या काळात काही इंग्रजी चारित्र्याचे मराठीत भाषांतर झाले. उदा. रावजीशास्त्री गोडबोले यांचे 'रॉबिन्सन क्रूसो' व हरी कृष्ण दामले यांचे 'गलिव्हरचा वृत्तांन्त' यासारख्या ग्रंथानी कादंबरीचे कार्य केले. तसेच 'सद्गुण स्त्री आणि आनंदीबाई' ही दोन पुस्तके बंगाली कादंबऱ्यातून भान् केशव गंगानाईक यांनी मराठीत आणली. फार्सी भाषेतूनही 'गुलसनोवर, गुलछबू, हातिमताई, गुलबकावली, बहारदानिश' अशी पुस्तके मराठीत कादंबरीची उणीव आहे. याची जाणीव निर्माण झाली व त्यातूनच मराठी कादंबरीचा जन्म झाला. १८४१ मध्ये जॉन बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोगेस' चे हरी

केशवजी यांनी भाषांतर करून 'यात्रिकीक्रमण' या नावाने प्रसिद्ध केली. प्रारंभीच्या काळातील वाङ्मयाच्या अनुकरणातून मराठी कादंबरी वाङ्मयाचा उदय झाला होता.

मराठीतील स्वतंत्र कादंबरीची सुरूवात बाबा पद्मनजी यांनी केली बाबा पद्मनजी यांनी इ. स. १९५७ मध्ये लिहिलेली 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी होय. त्या काळातील विधवांच्या शोचनीय अवस्थेचे सामाजिक चित्रण लेखकाने या कादंबरीत केले आहे. यमुनेचा प्रवास हे सूत्र घेवून त्या आधारे वेगवेगळ्या विधवांच्या दु:खाचे दर्शन बाबा पद्मनजींनी घडवले आहे. या कादंबरीची भाषा साधी, सरळ व ख्रिस्ती वळणाची होती. सुरूवातीच्या काळात मराठी कादंबरी कृत्रिम, नटवी भाषा, अद्‌भुतरम्य वातावरण यांचा परिणाम जाणवतो. यातूनच इ. स. १८६१ मध्ये लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी 'मुक्तामाला' निर्माण केली. ही कादंबरी खूपच लोकप्रिय ठरली. ह्या कादंबरीची लोकप्रियता पाहून लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी १८६६ मध्ये 'रत्नप्रभा' ही दुसरी कादंबरी लिहिली, तिलाही अफाट लोकप्रियता मिळाली त्यामुळेच त्याकाळी अद्‌भुत शृंगार रसप्रधान कादंबऱ्याची लाट निर्माण झाली. याच वळणावर ना. स. रिसबूड यांनी 'मंजुघोषा', 'विश्वासराव', 'वसंतकोकिळा' यासारख्या कादंबऱ्या निर्माण केल्या.

यापाठोपाठ अशा अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कालखंडातील कादंबरी ही कल्पनाविलासात, शृंगारात रमलेली दिसते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीने व इंग्रजी साहित्याने घातलेली भुरळ कमी होवू लागली. यातूनच पारतंत्र्यात असलेल्या भारतीयांना हिंदुस्थानाच्या इतिहासाविषयी व परंपरेविषयी अभिमान जागृत होवू लागला. यातूनच ऐतिहासिक कादंबरीचा जन्म झाला. इ. स. १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांनी 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहिली. ही कादंबरी शिवकालाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. याच सुमारास विष्णू जनार्दन पटवर्धन यांनी 'हंबीरराव'

आणि 'पुतळाबाई याचे चरित्र' (१८७३), द्वा. ना. रणदिवे यांची 'शिक्षक', शंकर रानडे यांची 'शिलादित्य' व नागेश विनायक बापट यांची 'संभाजी', चित्तुरगडचा वेढा', 'पानिपतची मोहीम.' इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण झाल्या. याकाळात विनायक बाळकृष्ण दामले यांची 'अवलिया', विनायक कोंडदेव ओक यांची 'शिरस्तेदार(१९८१)' ह्या सामाजिक कादंबऱ्या निर्माण झाल्या.

मराठी कादंबरी जी कल्पनाविलासात रमली होती तिला त्यातून बाहेर काढून वास्तवाच्या पातळीवर आणण्याचे काम हरिभाऊ आपटे यांनी केले. मराठी कादंबरीत एक समृद्ध वाटचाल हरिभाऊनी करून दिली. हरिभाऊंची पहिली सामाजिक कादंबरी 'मधली स्थिती' १८८५ मध्ये प्रसिद्ध झाली. यानंतर हरिभाऊंनी 'गणपतराव', 'पण लक्षात कोण घेतो?', 'यशवंतराव खरे', 'मी', 'जग' हे असे आहे'. 'भयंकर दिव्य', 'आजच मायेचा बाजार', 'कर्मयोग' ह्या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या तसेच 'म्हैसूरचा वाघ', 'गड आला पण सिंह गेला', 'उष:काल' अशा अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या हरिभाऊनी लिहिल्या.

मराठी कादंबरीला वास्तव बनवण्याचे, तिच्यातून सामाजिक स्थितीचे दर्शन घडविण्याचे आणि ऐतिहासिक कादंबरीमधून स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्याचे कार्य हरिभाऊ आपटे यांनी केले. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीला कलात्मक दर्जा मिळवून दिला आहे. याचकाळात नारायण हरी आपटे यांना सात्विक लेखन करणारे ग्रंथकार म्हणून ओळखले जाते. त्यानी 'वैभवाच्या कोंदणात', 'भाग्यश्री', 'याला कारण शिक्षण', 'पहाटेपूर्वीचा काळोख', 'सुखाचा मुलमंत्र' इत्यादी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. तसेच 'अजिंक्यतारा', 'रजपुतांचा भीष्म' अशा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. प्रसन्न व मधुर भाषाशैलीमुळे त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या.

यानंतर मराठी कादंबरीस वेगळे वळण देण्याचा प्रयत्न वा. म. जोशी यांनी केला थोर तत्वविवेचक, तार्किक पण सौंदर्यपिपासू वृत्तीचे सभ्य गृहस्थ होते. तात्विक

कादंबऱ्याचे जनक म्हणून श्री. वा. म. जोशीचा उल्लेख केला जातो. त्यांनी 'रागिणी', 'नलिनी', 'सुशीलेचा देव', 'इंदु काळे व सरला भोळे' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. कथानकाच्या माध्यमातून प्रभावी व्यक्तिचित्रण रंगविणे हे वा. म. जोशीच्या कादंबऱ्यांचे प्रधान वैशिष्ट्य होते. वामनरावानी स्त्रीविषयक प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. याचकाळात **डॉ. श्री. व्य. केतकरानी** 'गोडंवनातील प्रियवंदा', 'परागंदा', 'आशावादी' इत्यादी महत्त्वपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यातून त्याची प्रखर बुद्धिमत्ता, त्याची विवेचक दृष्टी यांचे दर्शन घडते. त्यांनी सामाजिक समस्यांना वाचा फोडली आहे. यानंतर न. चिं. केळकर यांनी 'नवलपूरचा संस्थानिक', 'बलिदान' शि. म. परांजपे याची 'गोविंदाची गोष्ट' व 'विंध्याचल' व श्री. कृ. कोल्हटकरांनी 'श्यामसुंदर' व 'दुटप्पी की दुहेरी' यासारख्या कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीच्या प्रवाहाला गती मिळवून दिली. यानंतर मराठी कादंबरीत फडके-खांडेकर युग आले. हरिभाऊ आपटे यांच्यानंतर मराठी कादंबरीस नवे वळण लावून देण्याचे कार्य ना. सी. फडके यांनी केले. त्यांची पहिलीच कादंबरी 'अल्ला हो अकबर' (१९१६). ही भाषांतरित असली तरी ती सर्वगुणांनी समृद्ध आहे. त्यानंतर फडके यांनी 'अटकेपार', 'कुलाब्याची दांडी', 'जादूगार', 'दौलत', 'निरंजन', 'कलंकशोभा' अशा अनेक कादंबऱ्या फडके यांनी लिहिल्या. मनोरंजन, निर्भेळ आनंद व कलेकरिता कला याच हेतूने त्यांनी सर्व कादंबऱ्या लिहिल्या आहेत. फडके यांनी मराठी कादंबरी वाचनीय केली. याचसुमारास वि. स. खांडेकरानी मराठी कादंबरी क्षेत्रात स्वतंत्र व आगळे स्थान निर्माण केले आहे. वि. स. खांडेकरांची पहिली कादंबरी 'ऱ्हदयाची हाक' (१९३०) प्रसिद्ध झाली. यानंतर 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'ययाती' इ. अनेक कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरी समृद्ध केली. खांडेकरांची भाषा ही प्रौढ, प्रगल्भ, संस्कृतप्रचुर, कोटीबाज व काव्यात्म आहे. फडके खांडेकरानंतर ग. त्र्यं. माडखोलकर यांनीसुद्धा कादंबरी क्षेत्रात विपुल लेखन केले. माडखोलकरांनी 'मुक्तात्मा', 'भंगलेले देऊळ' यापासून 'प्रेमद्वेश' पर्यंत

कादंबरीलेखन केले. संस्कृतप्रचुर भाषाशैली व विचारघनता हे त्यांच्या लेखणीचे विशेष होत. मनोविश्लेषणाचा उपयोग माडखोलकरांनी अनेक कादंबऱ्यातून केला आहे.

त्याचकाळात भा. वि. वरेकर यांची 'विधवा कुमारी', 'धावता धोटा', 'चिमणी' तसेच वि. वा. हडप यांची 'झाकली मूठ', 'माझा सम्राट', 'शिवशाहीचा शुभशकुन' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. वरेरकरांनी सामाजिक समस्यांची व उपेक्षित दलितांची चर्चा व हडप यांनी सामाजिक, ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिल्या. पुरूषोत्तम यशवंत देशपांडे यांनीसुद्धा मराठी कादंबरीत मोलाची भर घातली आहे. पु. य. देशपांडे यानी 'बंधनाच्या पलिकडे' (१९२७) या कादंबरीपासून 'आहुती' या कादंबरीपर्यंत अनेक कादंबऱ्या लिहिल्या असून त्या अत्यंत सरस अशा आहेत. याचसुमारास विभावरी शिरूरकर ह्या टोपण नावाने कादंबरी लिहिणाऱ्या मालतीबाई बेडेकरांनी कादंबरीक्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला. त्यांनी 'कळ्यांचे नि:श्वास'(१९३३), 'हिंदोळ्यावर' (१९३४), 'विरलेले स्वप्न'(१९३५), 'दोघांचे विश्व'(१९५४) इ. कादंबऱ्या लिहिल्या शिरूरकरांची 'बळी' (१९५०) ही कादंबरी खूप प्रसिद्ध झाली. या कादंबऱ्यांतून मराठीत मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्यांची परंपरा सुरू झाली. श्री. द. र. कवठेकरांनी नवमतवादांतील आत्यंतिककरणाचे दुष्परिणाम दाखविण्यासाठी 'विखुरलेले प्रेम', 'उजाडलेल्या भावना', 'अपुरा डाव' इ. कादंबऱ्या लिहिल्या.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीत अनेक नवनवे प्रवाह निर्माण झाले. कल्पनारम्यता दूर होवून वास्तवातल्या विषयांना, जीवनचित्रणांना महत्त्व आले. मराठी कादंबरीत ग्रामीण, प्रादेशिक, दलित कादंबऱ्यांचा प्रवाह सुरू झाला. ग्रामीण कादंबरीत उध्दव शेळके यांची 'धग' (१९६०) शंकर पाटील यांची 'टारफूला' (१९६४) रा. र. बोराडे यांची 'पाचोळा' तर आनंद यादव यांची 'गोतावळा' (१९७१) ह्या कादंबऱ्या महत्त्वपूर्ण ठरल्या. अशा अनेक लेखकानी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली.

ग्रामीणतेतूनच प्रादेशिक कादंबऱ्याची दिशा र. वा. दिघे यांनी 'पाणकळा' (१९४०) या कादंबरीने दाखवून दिली होती. प्रादेशिक कादंबरीत प्रादेशिकतेला प्राधान्य देण्यात आले. विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती दर्शन प्रादेशिक कादंबऱ्यातून घडू लागले.

प्रादेशिक कादंबरीत र. वा. दिघे यांची 'सराई', ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड', रणजित देसाई यांची 'माझा गाव' व व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी' ह्या कादंबऱ्या खूप प्रसिद्ध झाल्या. यातूनच प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह हा वाढत गेला.

प्रादेशिक कादंबरीबरोबरच दलित कादंबरी हा सुद्धा महत्त्वपूर्ण प्रवाह आहे. या प्रवाहाबद्दल वाटचालीबद्दल सविस्तर पाहूया.

**दलित साहित्य**

१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक वाङ्मयप्रकार निर्माण झाले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य अशा प्रकारचे नवनवे साहित्य प्रवाह उदयास आले. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील अनेक वर्ग शिक्षण घेवू लागले. त्यातील शिकलेल्यांना आपले अनुभव लिहून काढावेसे वाटले. त्यातून अन्य वाङ्मय प्रवाहाप्रमाणेच दलित साहित्याची निर्मिती झाली.

दलित साहित्याची प्रेरणा म्हणून म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्याकडे पाहिले जाते. महात्मा फुले यांनी मानवमुक्तीचा विचार मांडला. मानवत्वाची प्रतिष्ठा हा त्यांच्या विचारप्रणालीचा पाया होता. डॉ. आंबेडकरांनी दलिताच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी दलितामधील लाचारी व न्युनगंड नाहीसा करून आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केवळ शैक्षणिक प्रगतीवरच अवलंबून न राहता सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातसुद्धा जागृती होणे आवश्यक आहे. हा विचार पटवून दलितांना इतर क्षेत्रात प्रवेश मिळवून दिला. यातून आपल्या अन्यायाविरूद्ध दलित मन विद्रोही भावनेने लिहू लागले. व दलित साहित्य समृद्ध होवू

लागले. दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या विशाल, व्यापक विचार प्रेरणेतून १९६० पासून अनेक दलित साहित्यिकांनी साहित्यनिर्मिती केली. दलित साहित्यात कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन अशा विविध वाङ्मय प्रकारातून लेखन होवू लागते.

दलित साहित्यात कथा, कविता, नाटक या वाङ्मयप्रकारात जितक्या अधिक प्रमाणात लेखन झाले त्यामानाने दलित कादंबरी ही अधिक महत्वपूर्ण ठरली नाही. दलित कादंबरीचा विकास झाला नाही. तरीपण दलित कादंबरीला काही दलित लेखकानी त्याला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**दलित कादंबरी (स्वरूप)**

दलित साहित्यात दलित कादंबरी चे लेखन ही कमी प्रमाणात असले तरी ज्या काही थोड्याफार कादंबऱ्या झाल्या त्यांचे स्वरूप पारंपारिक मराठी कादंबरीपेक्षा निश्चितच निराळे आहे. दलित कादंबरी ही एखाद्या विषयापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक अविष्कार करण्याकडे अधिक झुकते म्हणून तर दलित कादंबरीमुळे मराठी वाङ्मयाचे क्षेत्र समृद्ध झाले.

दलित कादंबरी सामाजिक जीवनावर, विषमतेवर, जातीय परंपरेवर अधिक प्रकाश टाकते. दलित कादंबरीविषयी डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात. "दलित कादंबरीकाराने पूर्वास्पृश्य महार समाजातील तसेच अन्य विविध वर्ग व स्तर त्याचे आर्थिक व सांस्कृतिक मागासलेपण तसचे सामाजिक विषमतेमुळे त्यांना जे जे दुःख भोगावे लागले. त्याचे चित्रण दलित कादंबरीतून केले आहे.दलित लेखकानी आपल्या जीवनातील प्रक्षुब्ध अनुभव कादंबरीतून मांडले. हे करत असताना प्रत्यक्ष जीवनाबरोबर भाषा, समजुती, रूढी, राहणीमान, पोशाख, दैवते, सणवार व उत्सव, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, देवदेवस्की याचबरोबर आपल्या समाजात झालेल्या परिवर्तनाचा वेध घेतलेला आहे."[२७] यातून दलित कादंबरीतील सामाजिक जाणिवांचे दर्शन घडते.

दलित कादंबरीचे स्वरूप प्रा. वसंत बिरादार यांनी मांडलेल्या ठळक विशेषातून स्पष्ट होते.

१. ''दलित साहित्यात दलित कविता व दलित कथा या साहित्यप्रकारात मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झालेली आहे. दलित साहित्यिकांनी भावना व विचार व्यक्त करण्यास हे जवळचे मार्ग अंगिकारले दिसतात. त्या मानाने दलित कादंबरी हा साहित्यप्रकार बराच क्षीण वाटतो.

२. दलित कादंबरीकारांनी महार, मांग, भटक्या जमाती, तमासगीर, वाघ्यामुरळी, वेठबिगार, झोपडपट्टी, हातभट्टी, फुटपाथवरील जीवन, स्त्रियावरील अत्याचार, साम्यवाद, वर्गसंघर्ष, फासेपारधी, अनाथांची समस्या, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा, आदिम व ऐतिहासिक कालखंडातील दलित, दलितांमधील गटबाजीचे राजकारण, कुष्ठरोगी, शूद्र म्हणून जन्माला येण्याची खंत इ. विविध विषयांवर कादंबरी लेखन केले आहे.

३. दलित कादंबरीकारांपुढे दलित जीवनाचा गतकालीन व वर्तमानकालीन एवढा विशाल व विस्तीर्ण जीवनपट उभा असताना तसेच मराठी साहित्यात दलित जीवन हा विषय उपेक्षित असल्याची जाणीव असताना देखील कादंबरीकारांची लेखनी दलित जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा दलित्तेतर जीवनाकडेच अधिक झुकलेली दिसते.

४. दलित कादंबरी दलित समूह जीवनाचे, सामाजिक बांधिलकीचे तत्त्व जपताना दिसते.

५. दलित कादंबरीतील माणसे पोटासाठी धडपडताना दिसतात. पिढ्यानपिढ्या वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा, अन्याय निमूटपणे सहन करून जगताना दिसतात.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलितांनी शिक्षण घेऊन पुढे आले पाहिजे. एकजुटीने अन्यायाविरूद्ध लढा दिला पाहीजे. दलित माणसाला धर्मांतराशिवाय माणूस म्हणून जगता येणार नाही. हे विचार दलित कादंबऱ्यातून व्यक्त होताना दिसतात.

७. दलित कादंबरीकारांच्या बहुतांश कादंबऱ्या या रंजनपदपर, स्वप्नाळू, चटकदार अशा कादंबरीच्या वळणाच्याच आहेत.

८. दलित साहित्याच्या चळवळीमुळे एका विशिष्ट भूमिकेने दलित जीवनानुभवांचा केलेला स्विकार आणि त्यातून स्विकारलेले विशिष्ट स्वरूपाचेच अनुभव हे दलित कादंबरीच्या अभावाचे एक महत्त्वाचे कारण आहे.

९. आपल्या समाजाच्या जीवनापलीकडे दलित साहित्यिक आपल्या समाजाच्याच दृष्टिकोनातून पाहू शकतात. पण इतर समाजघटकाशी होणाऱ्या अभिसरणातून येणारी आकलन क्षमता दलित दृष्टिकोनातून आलेली दिसत नाही. तसेच कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारी चिंतनात्मक दृष्टिकोनाची गरज जाणवत नाही. त्यामुळे दलित साहित्यिकांच्या हातून कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकाराची निर्मिती फारशी होऊ शकलेली नाही.''[२८] यावरून दलित कादंबरीचे स्वरूप व तिचे दलित साहित्यातील स्थान समजते.

### दलित कादंबरी (वाटचाल)

दलित कविता, कथा, आत्मकथने या वाङ्मयप्रकारात पुष्कळ लेखन झाले. कादंबरी क्षेत्रात सुद्धा दलित लेखकानी थोड्याफार प्रमाणात लेखन केले आहे. दलित कादंबरीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचा सर्वप्रथम उल्लेख केला जातो. खऱ्या अर्थाने दलित कादंबरीची वाटचाल अण्णाभाऊ साठे यांनी केली. अण्णाभाऊंनी 'वारणेच्या खोऱ्यात'(१९५१), 'चित्रा'(१९५१), 'फकिरा'(१९५९), 'वैजयंता'(१९५९), 'चंदन

'(१९६२), 'अलगूज'(१९६९), 'माकडीचा माळ' (१९६३) यापासून ते 'फुलपाखरू'(१९७७) ह्या कादंबरीपर्यंत लेखन केले आहे. चित्रा, फकिरा, वैजयंता, चंदन, माकडीचा माळ, गुलाम इ. कादंबऱ्यामध्ये दलित जीवनाचे चित्रण आले आहे.

अण्णाभाऊंच्या कादंबरीलेखनाचा वेग व पसारा मोठा होता. त्यांनी दलित, उपेक्षित, पिडीत, शोषित लोकांचे सामाजिक प्रश्न कादंबऱ्यामधून मांडतात. अण्णाभाऊ स्वत: दलित समाजातील असूनसुद्धा त्यांच्या कादंबरीलेखनात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी प्रमाणात आढळते. याबद्दल डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ''अण्णाभाऊनी ज्या कांदबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे.''[२९] यांच्या या विचारातून अण्णाभाऊचे दलित लेखनाविषयी माहिती मिळते. अण्णाभाऊ साठे याच्यानंतर शंकरराव खरात यांनी कादंबरीलेखन समृद्ध केले. त्यांच्या 'हातभट्टी '(१९७०), 'मी मुक्त! मी मुक्त!'(१९७१), 'झोपडपट्टी '(१९७३), 'गावचा टिनोपाल गुरूजी '(१९७३), 'मसालेदार गेस्ट हौस'(१९७४), 'पारधी'(१९८०), 'फुटपाथ नं. १'(१९८०) या कादंबऱ्या महत्त्वपूर्ण आहेत. खरातांचे कादंबरीलेखन हे विशिष्ट विषय, एखादे उद्दिष्ट समोर ठेवून कादंबरीची रचना केली.

खरात यांच्यानंतर ना. रा. शेंडे ह्यांनी कादंबरीलेखन केले. त्यांनी 'शृंगारलेले प्रेत' (१९३८), 'काजळी रात्र' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'विलासिनी'(१९५४), 'अंशुजा'(१९७४), 'गायत्री'(१९७८) या कादंबऱ्या लिहिल्या. ना. रा. शेंडे एखादा महत्त्वपूर्ण विचार समोर ठेवून त्यावर कादंबरीच्या कथानकाची जडणघडण करताना दिसतात. याचे दर्शन 'शृंगारलेले प्रेत' या कादंबरीतून घडते. 'गायत्री' या कादंबरीत स्त्रियावरील अत्याचाराचा विषय आला आहे. शंकरराव खरातांनी दलित कादंबरीक्षेत्र समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. नामदेव व्हटकर यांनी 'अपराधी (१९४३)' व 'सोळा शिणगार (१९६८)' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. नामदेव व्हटकर विशिष्ट विचार समोर ठेवूनच कथानकाची उभारणी करताना दिसतात. त्यांनी

'अपराधी' मध्ये बेवारशी मुलांचा प्रश्न तर 'सोळा शिणगार' ही तमासगीरांच्या जीवनाचे दर्शन घडविते.

यानंतर हि. गो. बनसोडे यांनी 'मुक्तिसंग्राम (१९६९)', 'उज्वला' (१९७३), 'आभाळाएवढी'(१९८१), या तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ना. बं. जाधव यांची भाषाशैली ओघवती व साधी सरळ आहे. जाधव यांच्या कादंबरीची जडण घडण मुख्य कथानकाला उपकथानकाची जोड देऊन होताना दिसते.

केशव मेश्राम हे कवी प्रवृत्तीचे कादंबरीकार होते. केशव मेश्राम यांनी 'हकीकत', 'जटायू' (१९७२) व 'पोखरण' (१९७९) या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या 'हकीकत' आणि 'जटायू' व 'पोखरण' मध्ये दलितांच्या व्यथा साकारताना दिसतात.

यानंतर ज. वि. पवार यांनी 'बलिदान' (१९७०) ही पहिली कादंबरिका लिहिली. ज. वि. पवारानी 'बलिदान' मध्ये गटबाजी मुळे उद्ध्वस्त होणारे दलित जीवन साकारलेले आहे.

यानंतर हरिभाऊ पगारे यांची 'युगप्रवर्तक' (१९७६) ही कादंबरी महत्त्वपूर्ण आहे. ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील आत्मनिवेदनात्मक कादंबरी आहे.

यानंतर निशिकांत शेंडे यांची 'कलंकमुक्ती' (१९७०) ही पहिली कादंबरी आहे. भीमसेन देठे हा कवी माणूस त्यांची पहिलीच'इस्कोट' (१९८०) ही कादंबरी वाचनीय आहे. ही कादंबरी छोट्या-छोट्या प्रसंगातून व पंचवीस भागातून साकारताना दिसते. भिमसेन देठे यांनी धर्मांतरानंतर दलित व गावकरी यांच्यामधील संघर्ष टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

यानंतर भि. शि. शिंदे यांची 'अमृतनाक' (१९८०), सुधाकर गायकवाड यांची 'शुद्र' (१९८०) या कादंबऱ्या निर्माण झाल्या. दलित साहित्याचे प्रेरणास्रोत

म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ हाच विषय श्री. बा. स. हाटे यांनी आपल्या कादंबरीचा विषय केला आणि वेगळ्या वळणाची कादंबरी निर्माण केली.

बा. स. हाटे यांची 'भोगवटा' ही कादंबरी उल्लेखनीय आहे. कोणतीही कादंबरी लिहिताना जो कलात्मक संयम लागतो तो यांच्या कादंबरीत दिसतो.

उत्तम बंडू तुपे यांचे 'झुलवा', 'इंजाळ'आणि 'भस्म' या कादंबऱ्या लक्षवेधी वाटतात. तत्कालीन सामाजिक जीवनातील दुःख, दारिद्र्य, अंधश्रद्धा, भीषणता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नामदेव ढसाळ यांची ' हाडकी हाडवळा (१९८१)' ही कादंबरी लेखकाच्या अनुभवविश्वातून साकारताना दिसते.

अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी' (१९८२) प्रेमानंद गजवी यांची 'जागर', योगेंद्र मेश्राम यांची 'माझं गाव कुठाय', जे. बी. माने यांची 'मुक्ती', विजया शिरसाय यांची 'काळगर्भ', शरणकुमार लिंबाळे यांचे 'हिंदू' या कादंबऱ्या दलित कादंबऱ्या म्हणून लक्षवेधी ठरल्या व दलित कादंबरी क्षेत्र व्यापक करण्याचा प्रयत्न दलित लेखकानी केला. यामध्येच दलित कादंबरीला हातभार लावणारे कादंबरीकार योगीराज वाघमारे यांचे कादंबरीलेखन महत्त्वपूर्ण आहे. योगीराज वाघमारे यांनी 'सभापती', 'धुराळा' आणि 'पडझड' ह्या कादंबऱ्या लिहिल्या व दलित कादंबरी क्षेत्रात मौलिक भर घातली आहे.

**समारोप**

कादंबरीची संकल्पना मांडताना त्या विषयाचा सर्व बाजूने विचार होणे गरजेचे असते. या विचारात, कादंबरीची संकल्पना, कादंबरी म्हणजे काय? कादंबरीची उत्पत्ती, कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक कोणते? यांचा विचार करून मराठी कादंबरीची वाटचाल कशी झाली हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठीतील कादंबरी प्रवाह हा भाषांतरित कादंबऱ्यापासून, वास्तववादी कादंबरीपर्यंत कसा झाला ह्याचा अभ्यास ह्या प्रकरणात केला आहे. मराठी साहित्यातील

दलित साहित्याची प्रेरणा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच दलित कादंबरीचे स्वरूप कसे आहे व दलित कादंबरीची वाटचाल कशी विस्तारत गेली याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

अशा प्रकारे कादंबरी संकल्पना, वाटचाल व दलित कादंबरीचा अभ्यास व पुढील प्रकरणात महत्त्वपूर्ण कादंबरीकार योगीराज वाघमारे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व वाङ्मयाचा अभ्यास पुढील प्रकरणातून करण्यात येत आहे.

# संदर्भ सुची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | फडके भालचंद्र | : | 'प्रदक्षिणा', प्रकाशक, अ. अ. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९६५, पृ. १९९. |
| २. | जाधव रा. ग. | : | मराठी विश्वकोश खंड-३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्र. आ., १९७६, पृ. ५९९. |
| ३. | दाते यशवंत<br>कर्वे, चिंतामणी | : | महाराष्ट्र शब्दकोश विभाग दूसरा, प्रकाशन-ह. आ. भावे, प्र. आ., एप्रिल १९३३, नवी आवृत्ती १९८८, पहिले पुनर्मुद्रण दिपावली १९९५, पृ. ६७८. |
| ४. | संत जान्हवी | : | कादंबरी एक वाङ्मय प्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, प्र. आ., पृ. ८. |
| ५. | तत्रेव | : | पृ. १३. |
| ६. | तत्रेव | : | पृ. १४. |
| ७. | फडके ना. सी. | : | 'प्रतिभा साधन', सातवी आवृत्ती, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे. पृ. १३. |
| ८. | नेमाडे भालचंद्र | : | टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. सप्टे-१९९०, पृ. २०७. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | संत जान्हवी | : | कादंबरी एक वाङ्मयप्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., १९७१, पृ. १४. |
| १०. | जाधव रा. ग. | : | मराठी ग्रामीण कादंबरी (रविंद्र ठाकूर), मेहता पब्लिकेशन, पुणे-३०, पृ. ७. |
| ११. | संत जान्हवी | : | कादंबरी एक वाङ्मयप्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. १९७१, पृ. १५. |
| १२. | प्रेमचंद | : | कादंबरीची रचना (कुलकर्णी श्री. मा.), उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९५६, पृ. १४. |
| १३. | गुप्त मैथिलीशरण | : | कादंबरी एक वाङ्मय प्रकार, (जा.सं.)मोघे प्रकाशन, १९७१, प्र. आ., पृ. १४. |
| १४. | सुंदरदास श्याम | : | कादंबरीची रचना (कुलकर्णी श्री. मा.), उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९५६, पृ. १४. |
| १५. | श्री. गुलाबराय | : | कादंबरीची रचना (कुलकर्णी श्री. मा.), उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९५६, पृ. १४. |
| १६. | डॉ. गुप्त गणपतीचन्द्र | : | हिन्दी भाषा एवंम साहित्य विश्वकोश खंड, एटलांटिक पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली, प्र. संस्करण, १९९५, पृ. ९९. |

१७. डेविड सीसील : कादंबरी–एक वाङ्मय प्रकार (जान्हवी संत) मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., १९७१, पृ. १२.

१८. प्रिस्टले. जे. बी. : कादंबरी–एक वाङ्मय प्रकार (जान्हवी संत), मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., १९७१, पृ. १२.

१९. अनेस्ट बेकर : मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप (कुलकर्णी मदन), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९८४, पृ. ५.

२०. जेम्स हेनरी : कादंबरी–एक वाङ्मय प्रकार (जान्हवी संत) मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., १९७१, पृ. १२.

२१. कॅथरीन लिव्हर : मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप (कुलकर्णी मदन), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९८४, पृ. ५.

२२. डहाके वसंत आबाजी : विशिष्ट साहित्यप्रकार कादंबरी, मुंबई विद्यापीठ प्रकाशन. मुंबई. कादंबरी, पृ. ३८.

२३. बापट प्र. वा. गोडबोले ना. वा. : मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, ति. आ., १९७३, पृ. ८९.

२४. तूर्गनेव्ह : मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप, (कु. मदन) श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९८४, पृ. ८.

२५. प्रा. संत जानव्ही : कादंबरी : एक वाङ्मयकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., १९७१, पृ. ६४.

२६. बापट व गोडबोले : मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे, ति. आ., १९७३, पृ. १२९.

२७. डॉ. कुलकर्णी मदन : दलित जाणिवेची कादंबरी, अनंत प्रकाशन, नागपूर, प्र. आ., १९९३, पृ. ३.

२८. डॉ. बिरादार वसंत : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, आवृत्ती १९९९, पृ. २४१,२४२.

२९. फडके भालचंद्र : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, (डॉ. बिरादार वसंत) कैलाश प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, आवृत्ती १९९९, पृ. २३४.